# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३८४-२२** **दिनांक १५/१२/२०२२**

## अंमली पदार्थासहीत अवैध गावठी बनावटीचे पिस्तुल आणि कट्टा बाळगणा-या सराईत आरोपीवर गुन्हे शाखा कक्ष-२ वसई यांची कारवाई

दिनांक ११/१२/२०२२ रोजी सकाळी ०८.०५ वाजता गुन्हे शाखा कक्ष -२ वसई कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री शाहुराज रणवरे यांचे नेतृत्वाखाली गुन्हेगार वॉच पेट्रोलींग करित असताना मोरेगाव नाक्यावरील लाईटचे डिपीजवळ नालासोपारा पुर्व येथे संशईत ईसम नामे राजकुमार लालचंद गुप्ता उर्फ राजु बैल वय – ३४ वर्षे, धंदा - बेकार, रा. बी-५, गणेश प्रसाद चाळ, मोरेगाव नाका विरार रोड नालासोपारा पु. ता. वसई जि. पालघर हा पोलीस आल्याची चाहूल लागताच लपण्याचा प्रयत्न करित असताना त्याचेबाबत संशय आल्याने त्यास गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या ईसम नामे राजकुमार लालचंद गुप्ता उर्फ राजु बैल याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात मिळालेल्या प्लॅस्टीक पिशवीमध्ये १०,००,०००/- रुपये किंमतीचा १०० ग्रॅम एम डी (MD) हा अंमली पदार्थ तसेच ७१,०००/- रु किंमतीचे ०१ गावठी बनावटीचे पिस्तुल, ०१ गावठी कट्टा व ११ जीवंत काडतुसे अशा अवैध हत्यारासहीत मिळुन आल्याने दोन पंचांचे समक्ष सविस्तर पंचनामा करुन त्यास मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीविरुध्द पोहवा/०६१०७ रमेश रामचंद्र आलदर नेम- गुन्हे शाखा-२ वसई युनीट, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांनी सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद दिली असुन त्याबाबत तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं ७८८/२०२२ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(क), २२ प्रमाणे व भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ (१)(ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास तुळींज पोलीस ठाणे हे करीत आहे.

नमुद आरोपीत राजकुमार लालचंद गुप्ता उर्फ राजु बैल हा दिनांक १४/०२/२०२१ रोजी रात्री २१.०० वाजता साई दया अपार्टमेंट मधील शॉप नं -४, क्यु ॲंड क्यु बार समोर, मोरेगाव, नालासोपारा पुर्व येथे बिअर पित बसलेला असताना आरोपीत बबुआ उर्फ चंद्रशेखर रामसागर गुप्ता आणि ईतर ६ आरोपीत यांनी राजकुमार लालचंद गुप्ता याचेवर रिव्हॉल्व्हरच्या ३ गोळया झाडुन त्याचे डोक्यावरती, डावे व उजव्या हातावर घातक हत्याराने वार करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत दिनांक १५/०२/२०२१ रोजी तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं २२५/२०२१ भादविस ३०७, १२०(ब), २०१, ३४ सह आर्म ॲक्ट कायदा कलम ३(२५),४(२५) प्रमाणे गुन्हा नोंद आहे. आरोपीत राजकुमार लालचंद गुप्ता उर्फ राजु बैल यास ताब्यात घेतल्यानंतर त्याच्या ताब्यातुन मिळुन आलेल्या अवैध शस्त्राबाबत चौकशी करित असताना त्याने ती अग्नी शस्त्रे ही पुर्व वैमनस्यातुन बदला घेण्यासाठी उत्तरप्रदेश येथून आणली असल्याची माहिती चौकशी दरम्यान सांगितली आहे. अशारितीने गुन्हे शाखा कक्ष-२ वसई यांनी सदर

आरोपीत यास त्याने गुन्हा करण्यापुर्वीच हत्यारानीशी ताब्यात घेवून खुन अगर खुनाच्या प्रयत्नासारखा गंभीर गुन्हा घडण्यापासुन प्रतिबंध केला आहे.

नमुद आरोपी राजकुमार लालचंद गुप्ता उर्फ राजु बैल हा गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेला सराईत गुन्हेगार असुन त्याचेविरोधात तुळींज पोलीस स्टेशन, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय येथे यापुर्वी खालीलप्रमाणे शरिराविरुध्दचे गुन्हे दाखल आहेत.

| अ. क्र. | पोलीस स्टेशन | गु. रजि. नं. | कायदा व कलम | मपोका कायदा कलम ५६ प्रमाणे प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| ०१ | तुळींज पो. स्टे. | ३१/२०१५ | भारतीय दंड संहीता कलम १४३, ३२४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे | महा. पो. अधि कलम ५६ प्रमाणे प्रस्ताव क्र. ०१/२०१६ दि. ३०/०४/२०१६ |
| ०२ | तुळींज पो. स्टे. | ३६/२०१५ | भारतीय दंड संहीता कलम १४३, १४७, १४८, ३२५, ३२४, ४२७, ५०४, ५०६ प्रमाणे | |
| ०३ | तुळींज पो. स्टे. | ५५६/२०१५ | भारतीय दंड संहीता कलम ३२४, ४२७, ३४ प्रमाणे | महा. पो. अधि. कलम ५६ (१)(अ)(ब) प्रमाणे प्रस्ताव क्र. १२/२१२१ जा.क्र. १६११/२०२१ दि. १६/१२/२०२१ |
| ०४ | तुळींज पो. स्टे. | ६८८/२०१५ | भारतीय दंड संहीता कलम २७९, ३३७, ३३८ सह मोवाका कलम १८४ प्रमाणे | |
| ०५ | तुळींज पो. स्टे. | ६८६/२०१६ | भारतीय दंड संहीता कलम ३२४, ३२३, ५०४ प्रमाणे | |
| ०६ | तुळींज पो. स्टे. | ३१/२०१७ | भारतीय दंड संहीता कलम ३५४, ४५२, ५०४, ५०६ प्रमाणे | |
| ०७ | तुळींज पो. स्टे. | ९७८/२०१८ | म.पो.का. कलम १४२ प्रमाणे | |
| ०८ | तुळींज पो. स्टे. | १२७२/२०२१ | भारतीय दंड संहीता कलम ३२६, ३६७, ३२३, ४५२, ५०४, ५०६, ४२७, १४३, १४७, १४८, १४९ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ प्रमाणे | |

सदरची कामगिरी श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक श्री शाहुराज रणवरे, सपोनिरी/सागर शिंदे, सपोनिरी/सुहास कांबळे, सहाफौज/९६०३६ संजय नवले, सहाफौज/९५०२१ मंगेश चव्हाण, सहाफौज/ ९५०१३ रमेश भोसले, पोहवा/०३०५२ चंदन मोरे, पो.हवा./०३०४९ महेश पागधरे, पोहवा/०६०२५ सचिन पाटील, पोहवा/०५०३३ जगदिश गोवारी, पोहवा/०६१०७ रमेश आलदर, पोना/०३०३२ प्रशांतुकमार ठाकुर, पोशि/१२०९७ अमोल कोरे, सायबर शाखेचे सहाफौज/ संतोष चव्हाण यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.


गुन्हे शाखा
मिरा भाईंदर- वसई विरार पोलीस आयुक्तालय
विरार कक्ष - ३
CRIME BRANCH
By MetroCityS 2022.12.15 18:17

-----0000-----